सकाळ » TODAY

बुधवार,
१७ ऑगस्ट २०२२



दोडामार्ग : चित्रकला स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी मान्यवर.

# हळबे महाविद्यालयात चित्रकला स्पर्धेस प्रतिसाद

दोडामार्ग, ता. १६ : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत आयोजित या स्पर्धेचे उद्‌घाटन दोडामार्ग येथील माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष कॅप्टन कृष्णा गवस यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी सैनिक सुभेदार डांगी, हनुमंत सरवणकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, विस्तार विभागाचे डॉ. सोपान जाधव, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. वैदेही परमेकर हिने प्रथम, आकाश वाघमोरे व प्रशांती गवस यांनी द्वितीय, तर आरती कविटकर व श्रद्धा कांबळे यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळविला. अस्मिता धर्णे, गौरी ठाकूर व प्रजा गवस यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. परीक्षण प्रा. प्रीती प्रसादी, किरण नाईक यांनी केले.